MHSO110018802024

**नियमित दिवाणी दावा क्र. ६६७/२०२४**

(राहुल सावंत वि. बाजीराव सावंत व इतर)

## निशाणी क्र. २४ खालील आदेश

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादीचे वारस रेकार्डवर आणणेकरीता झालेला विलंब माफ होऊन वारस रेकॉर्डवर घेतलेनंतर दुरुस्ती करुन मिळणे करीता दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ०२ हे दिनांक २२/१०/२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस रेकार्डवर घेण्यासाठी विलंब झालेला आहे. त्यांच्या वारसांना सदरचा दावा चालविण्याचा कायदेशीर अधिकार आहे. त्यामुळे सदरचा विलंब माफ करुन तशी दुरुस्ती होवून मिळणेसाठी हा अर्ज वादीने दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जाला म्हणणे दाखल केले नाही. अर्ज विना म्हणणे चालविण्यात येतो.

३. दाव्याचे योग्य ते निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणदोषावर चालविण्यासाठी प्रतिवादीचे वारस रेकार्डवर असणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी चे वारस रेकार्ड वर घेणे उचित ठरते. परंतु तत्पुर्वी वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे गरजेचे आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज रक्कम रुपये ५००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादी यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत किंवा त्या आधी द्यावी. |
| ३. | प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे. |
| ४. | वादी यांनी वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर वादीने दाव्याच्या |

| | |
|---|---|
| | सरनाम्यामध्ये योग्य ती नियोजीत दुरुस्ती दाव्यात करावी व दाव्याची दुरुस्त प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

Digitally signed by GULFARAZ MAQSOOD BIRADAR
Date: 2026.04.15 18:56:34 +0530

(जी. एम. बिरादार)

दिनांकः– १५.०४.२०२६ ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माळशिरस

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | P. S. Kore |
| Court | - | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Malshiras |
| Date of Judgment/Order | - | 15.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 15.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 15.04.2026 |